**<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>**

(दिनांक १३/०३/२०२६)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला असून प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांनी दाव्याचा अंतिम लागेपावेतो वादीने भरलेले ई–निविदा बाबतची तांत्रीक फेरतपासणी होईपर्यत प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी बेकायदेशीर प्रक्रियेच्या जोरावार प्रतिवादी क्रं. ३ यांना Tender ID DWS/GPCH/ET/01/2025–2026 या ई–निविदेमध्ये मंजुर केलेला कामाचा कार्यारंभ आदेश देवु नये अथवा कार्यारंभ आदेश दिला असल्यास प्रतिवादी क्रं. ३ याने निविदेप्रमाणे काम चालु करु नये अशी तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम मिळण्याकामी दाखल केलेला आहे.

**<u>वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–</u>**

२. वादी हा रजिस्टर गर्व्हमेंट कॉन्ट्रॅक्टर असुन वादीस सरकारी ऑनलाईन, ऑफलाईन कॉन्ट्रॅक्टर घेवुन ते काम करणेचा पाच वर्षाचा अनुभव आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ हे ग्रामपंचायत चौंडेश्वरवाडीचे अनुक्रमे सरपंच व ग्रामसेवक आहेत. दिनांक २८/११/२०२५ रोजी प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी ई–निविदा अंतर्गत खुली निविदा सुचना क्रं. DWS/GPCH/ET/01/2025–2026 अन्वये मौजे चौंडेश्वरवाडी, ता. माळशिरस येथील अनुसूचित जाती जमाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजने अंतर्गत कुदळे प्लॉट येथे ज्ञानेश्वर कुदळे

घर ते बलभिम कुदळे घर कॉक्रीट रस्ता करणे आणि उदयनगर येथे हनुमंत खुडे घर ते निशा खुडे घर कॉक्रीट रस्ता करणे या दोन कामासाठी निविदा प्रसिद्ध करुन त्याची अंदाजे किंमत रक्कम रुपये १९,६६,३७८/– एवढी नमुद केलेली असुन कामे पुर्ण करणेस सहा महिने एवढी मुदत निर्धारित केली. त्यानुसार इतर तीन लोक व वादी पात्र असल्याने ई–निविदा ऑनलाईन पद्धतीने मुदतीत भरलेली आहे. ई टेडंर प्राप्त झाल्यानंतर निविदा समितीकडुन तांत्रीक बोली लिफाफा क्रं. १ उघडणे, कागदपत्रांची तपासणी करणे, कॉन्ट्रॅक्टरची तांत्रीक पात्रता तपासणे व त्याचा तपशिल नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणे, त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्यासंबंधी कॉन्ट्रक्टरला ईमेल पाठविले, तक्रारीचे निवारण होईपर्यत लिफाफा क्रं. २ न उघडणे अशी कार्यपद्धती आहे. शासन परिपत्रक क्रं. सीएसटी–२०१९/प्र.क्र.१२०/इमारती–२, मंत्रालय, मुंबई दिनांक १७/०९/२०१९ अन्वये सर्व तरतुदींचे पालन करुन त्यानुसार छाननी होवुन निविदा देणेत येते.

**३.** अशी वस्तुस्थिती असताना, प्रतिवादी क्रं. १ व २ यांचेकडुन शासन परिपत्रकानुसार व कार्यपद्धतीनुसार कोणतेही पालन न करता घाईगडबडीने तांत्रीक बोलीचे लिफाफे क्रं. १ हा दिनांक १५/१२/२०२५ रोजी उघडला. प्रत्यक्षात प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी लिफाफा क्रं. १ चे ईव्हॅल्युशन न करता वादीने भरलेली ई–निविदा ही not complied with technical specification असे कारण देवुन त्याचे कोणतेही स्पष्टीकरण न देता बेकायदेशीरपणे वादीस अपात्र ठरविले. मात्र त्यासंदर्भात वादीस कोणतीही नोटीस अथवा ई–मेल पाठविणेत आले नाही. त्यामुळे

वादीने प्रतिवादी क्रं. १ व २ यांना त्याबाबत तक्रारी अर्ज देवुन खुलासा मागितला. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी घाईगडबडीने प्रतिवादी क्रं. ३ या कंत्राटदारांशी संगनमत करुन व कायदेशीर तरतुदीचे पालन न करता ई–टेंडरच्या तरतुदींचे उल्लंघन करुन लिफाफा क्रं.२ हे दिनांक २६/१२/२०२५ रोजी ६.०३ वाजता उघडण्याची प्रक्रिया बेकायदेशीरपणे करुन वादीला जाणुनबुजुन अपात्र केलेले आहे. वास्तविक पाहता वादी यांनी सदर ई–निविदे मध्ये प्रसिध्द केलेल्या अंदाजे रक्कमेपेक्षा ९.९% कमी दराने निविदा भरलेली आहे तर प्रतिवादी क्रं. ३ यांनी सदर ई–निविदेमध्ये प्रसिद्ध केलेल्या रक्कमेवरच त्यांची ई–निविदा भरलेली आहे. त्यामुळे वादीचे अपरिमित नुकसान झाले आहे. त्यामुळे प्रस्तुचा अर्ज वादीने प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी बेकायदेशीररित्या प्रतिवादी क्रं. ३ यास दिलेले ई–टेंडर कामाचा कार्यारंभ आदेश देवु नये अथवा आदेश दिला असल्यास निविदेप्रमाणे काम चालु करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्याची विनंती केली आहे.

**<u>प्रतिवादींचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–</u>**

४. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी न्यायालयात हजर राहुन त्यांचे म्हणणे निशाणी क्रं. १७ वर दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी कथन करतात की, वादीने प्रतिवादी क्रं. २ व ४ यांना ग्रामपंचायत अधिनियम कलम १८० नुसार नोटीस देणे बंधनकारक असताना देखील नोटीस दिलेल्या नसुन ग्रामपंचायत चौंडेश्वरवाडी यांना दाव्यात पक्षकार केलेले नाही. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान कोणताही करार झालेला नसल्याने कॉन्ट्रॅक्च्युअल ऑब्लीगेशन निर्माण

झालेला नाही. त्यामुळे टेंडरच्या आधारे दाद मागणेचा अधिकार येत नाही. त्यामुळे वादीला कोणतीही लोकस स्टॅण्डी येत नाही. प्रतिवादी क्रं. १ व २ यांचेकडे आलेला विकास निधी हा महाराष्ट्र शासनाचा असल्याने महाराष्ट्र शासन आवश्यक पक्षकार आहे. यापुर्वी वादीला प्रतिवादी क्रं. १ तर्फे टेंडरव्दारे काम दिलेले असताना वादीने ते काम नियमानुसार वेळेत व मुदतीत व शासकीय मानकानुसार केलेले नसुन निकृष्ट दर्जाचे केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ ग्रामपंचायतीचे, नागरिकांचे व शासनाचे नुकसान झालेले आहे. वादीने आवश्यक कागदपत्रे देणे बंधनकारक असताना, व ते दयावे लागतात याची माहिती असतानादेखील कागदपत्र जोडलेले नसल्याने वादीचा निविदा रद्द झालेला आहे. वादीने दावा टेंडरच्या अनुषंगाने दाखल केलेला आहे. मात्र टेंडर भरल्याने वादीस कोणताही हक्क व अधिकार मिळालेला नाही. वादीने नियमांचे व अटींचे तसेच कागदपत्रांचे पालन केलेले नाही. वादीस कोणतेही आर्थिक नुकसान होत नाही. त्यामुळे वादीला सकृतदर्शनी केस नाही. वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. शासनाचे व नागरिकांचे नुकसान होणार आहे. प्रस्तुत दावा दाखल करण्याकरीता वादीस हक्क व अधिकार नसल्याने प्रस्तुतचा दावा व अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**५.** प्रतिवादी क्रं. ३ यास नोटीस पाठविले असता त्याने घेण्यास नकार दिल्याने त्याचेविरुध्द एकतर्फा सदरचा अर्ज चालविणेत आला.

**६.** वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या कथनांवरुन व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन पुढील मुद्दे माझ्या समक्ष उपस्थित झाले. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| १. | वादी सकृत दर्शनी केस त्याच्या बाजुने आहे, हे सिद्ध करतो का? | **नाही** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे, हे वादी सिद्ध करतो का? | **नाही** |
| ३. | अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे, हे वादी सिद्ध करतो का? | **नाही** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ ते ३ करीताः–

**७.** मुद्दा क्रमांक १ ते ३ एकमेकांशी सलंग्न असल्याने चर्चेची वारंवारता टाळण्याकरीता तिन्हीं मुद्दयांची कारणमिमांसा एकत्रीत नोंदवित आहे. वादी यांचे विद्वान वकील श्री.बी.सी.पोरे व प्रतिवादी क्रं. १ व २ करीता विद्वान वकील श्री.जी.पी.

कदम यांचा सखोल युक्तीवाद ऐकला. वादीने त्याचे अर्जानुसार व कागदपत्रांनुसार सखोल युक्तीवाद केला व प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यानुसार सखोल युक्तीवाद केला. वादी तर्फे व प्रतिवादी क्रं. १ व २ तर्फे दाखल सर्व कागदपत्रांचा मी सखोल अभ्यास केला.

८. वादीच्या कथनांनुसार मौजे चौडेंश्वरवाडी येथील रस्त्याकरीता ई–निविदा अंतर्गत खुली निविदा सुचना प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी दिनांक २८.११.२०२५ रोजी प्रसिद्ध केलेली होती. दोन कॉक्रीट रस्ते तयार करण्याकरीता निविदा प्रसिद्ध करुन अंदाजे रक्कम रुपये १९,६६,३७८/– एवढी नमुद केलेली होती व सहा महिने मुदत निर्धारित केलेली होती. त्याप्रमाणे वादी हा रजिस्टर्ड गर्व्हमेंट कॉन्ट्रॅक्टर असल्याने प्रतिवादींनी नमुद केलेल्या रक्कमेपेक्षा ९.९% कमी दराने ई–निविदा टेंडर भरलेले होते. त्याकरीता लागणारी सर्व कागदपत्रे देखील जमा केलेली होती. परंतु शासन परिपत्रक मध्ये दिलेल्या नियमांनुसार ई–टेंडर प्राप्त झाल्यानंतर निविदा समितीकडुन प्रथम तांत्रीक बोलीचा लिफाफा उघडणे, त्यातील कागदपत्रांची तपासणी करुन, कत्रांटदाराची पात्रता तपासुन त्याबाबत नोटीस अथवा त्रुटी प्रसिद्ध केल्यानंतर त्याचे निवारण झाल्यानंतर लिफाफा क्रं. २ उघडणे गरजेचे आहे. परंतु अशी कोणतीही कार्यपद्धती प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी अवलंबलेली नाही. प्रतिवादी क्रं. ३ यांच्या सोबत प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी हातमिळवणी करुन दिलेल्या रक्कमेकरीता त्यांची ई–निविदा स्वीकारलेली आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी प्रतिवादी क्रं. ३ यांचेसोबत संगनमत करुन वादीची ई–निविदा Not complied

with technical specification या कारणानुसार कोणतेही स्पष्टीकरण न देता अपात्र ठरविलेली आहे. वादीने आवश्यक ती कागदपत्र जमा केलेली आहेत.

९. नियमानुसार वादीच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्यासंबंधी वादीस ई–मेल अथवा नोटीस पाठविणे बंधनकारक आहे व सदर त्रुटींचे वादीने निवारण करेपर्यंत ई–निविदा स्वीकारणेचे काम प्रतिवादी क्रं. १ व २ यांना करता येत नाही. असे असताना, प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी घाईगडबडीत नियमांचे पालन न करता तांत्रीक बोलीचा लिफाफा क्रं. १ हा दिनांक १५/१२/२०२५ रोजी उघडला. प्रत्यक्षात प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी लिफाफा क्रं. १ चे इव्हाइल्युशन केलेले नाही. वादीस अपात्र ठरविण्यापुर्वी वादीस कोणताही ई–मेल अथवा नोटीस पाठविलेली नव्हती. तसेच तक्रार निवारण करण्याकरीता नियमाप्रमाणे वादीस आठ ते दहा दिवसांचा कालावधी दिलेला नव्हता. प्रतिवादी क्रं. ३ यास दिलेली ई–निविदा टेंडर या कामाचा कार्यारंभ झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच शासनाचे देखील नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी क्रं. ३ यास कोणतेही नुकसान होणार नाही. यानुषंगाने वादीचे विद्वान विधिज्ञ यांनी सखोल युक्तीवाद केला. तसेच विविध न्यायनिर्णयावर अवलंबुन राहुन त्यांची बाजु मांडलेली आहे.

१०. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी केलेल्या कथनांनुसार व दाखल कागदपत्रांनुसार प्रतिवादी क्रं. १ व २ आणि वादी यांचेमध्ये कोणतेही करार झालेले नाही. त्यामुळे वादीस सदर दावा दाखल करण्याचा अधिकार येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र नाही. वादीस नियमानुसार ई–मेल अथवा नोटीस

पाठविलेली नसल्यास त्याविराधोत तक्रार करण्याची संधी वादीस आहे. परंतु प्रतिवादी क्रं. ३ यांना दिलेले ई–निविदा टेंडर थांबविण्याचा अधिकार नाही. वादीचे यापुर्वीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने व ते शासकीय मानकानुसार नसल्याने प्रतिवादी क्रं. १ व नागरिक यांचे नुकसान झालेले आहे. वादी ठरलेल्या वेळेत व ठरलेल्या दर्जाचे काम करुन देत नसल्याने वादीस सदर ई–निविदा टेंडर दिलेले नाही. वादीने ई–निविदा सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यामुळे वादीचे टेंडर मान्य केलेले नाही. वादीस पुर्वीचा अनुभव असल्याकारणाने त्याला निविदेसोबत कोणते कागद दयावे लागतात याबाबत माहिती होती. शासन निर्णय क्रं. ग्राप–२०१८/प्र.क्रं.२८/पंरा–४, दिनांक १३/०६/२०१८ नुसार स्थळपाहणी अहवालाशिवाय काम पुर्ण मानता येत नाही तसेच शासन निर्णय क्रं.जीओ–२०१९/प्र.क्रं.१२१/पंरा–३, दिनांक १७/०९/२०१९ नुसार जिओ–टॅगींग व स्थळतपासणी अनिवार्य असताना सुद्धा सदर कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडली नाहीत व प्रस्ताव अपुरा जोडला आहे.

**११.** अशा परिस्थितीत सदर प्रस्ताव मान्य होवु शकत नाही. प्रतिवादी क्रं. ३ यांनी संपुर्ण कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांना सदर करार करुन दिलेला आहे. तसेच प्रतिवादी क्रं. ३ यांच्या कामाचा दर्जा हा चांगला असलेबाबत कागदपत्र सोबत जोडलेली आहेत. प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यासोबत रस्त्याकरीता वादीचा कोणताही करार नसल्याने तसेच प्रतिवादी क्रं. ३ सोबत असलेल्या करारामध्ये वादी हे पक्षकार नसल्याने वादीस प्रस्तुतचा दावा चालविता येणार नाही.

प्रतिवादी क्रं. ३ यांचे तसेच प्रतिवादी क्रं. १ व २ आणि शासन यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. शिवाय नागरिकांचे देखील अपरिमित नुकसान होणार आहे. प्रस्तुत अर्ज नामंजुर केल्यास वादीस कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१२.** प्रस्तुत दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीकरीता केलेला आहे. ग्रामपंचायत चौंडेश्वरवाडी यांचे मार्फत प्रतिवादी क्रं. ३ यास दिलेल्या ई–निविदा प्रक्रियेचे काम बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठराव तसेच वादीच्या ई–निविदाच्या तांत्रीक फेरतपासणी बाबत प्रतिवादी क्रं. १ व २ यांना आदेश देण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने भरलेली ई–निविदा याची फेरतपासणी होईपर्यत प्रतिवादी क्रं. ३ यांना मंजुर केल्याप्रमाणे कार्यारंभ आदेश देवु नये अथवा दिला असल्यास त्याचे काम चालु करु नये अशी तुतातुर्त मनाईची विनंती केलेली आहे. सदरची मागणी वादीने त्याने भरलेली ई–निविदा त्याबाबत असलेली तांत्रीक फेरतपासणी याबाबत आहे व ती पुर्ण होईपर्यत प्रतिवादी क्रं. ३ यांनी रस्त्याचे काम सुरु करु नये अशी तुर्तातुर्त मनाई मागितलेली आहे. सदर अर्जामध्ये वादीस रस्त्याचे कामकाज थांबविण्याचा, सदरचा दावा दाखल करण्याचा व प्रतिवादी क्रं. ३ यांना कार्यारंभ आदेश देवु नये अशी मागणी करण्याचा प्रथमदर्शनी अधिकार आहे किंवा कसे. तसेच वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यादरम्यान ई–निविदा टेंडर कॉन्ट्रॅक्च्युल रिलेशन निर्माण झाले आहेत किंवा नाही व त्याआधारे वादी रस्त्याचे कामकाज थांबवु शकतो किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

**१३.** वादीने ई–निविदा टेंडर भरणेकरीता त्याच्याकडे योग्य ती पात्रता असल्याचे शिवाय त्याला अनुभव असल्याचे सांगितलेले आहे. त्याकरीता कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. ठरलेल्या किंमतीपेक्षा वादीने ९.९% कमी दराने ई–निविदा टेंडर भरलेले आहे. प्रतिवादी क्रं. ३ यांनी ठरलेल्या किंमतीस ई–निविदा टेंडर भरलेले आहे. वादीने नियमाप्रमाणे योग्य ती कागदपत्रे दाखल न केल्याकारणी शिवाय वादीचे पुर्वीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने व ते वेळेत पुर्ण न केल्याने प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी सदर रस्त्याचे टेंडर त्यांना दिलेले नाही. वादीस तांत्रीक फेरतपासणीकरीता योग्य ती मुदत मिळणे तसेच फेरतपासणी होईपर्यत प्रतिवादी क्रं. ३ यांना टेंडर देणे प्रथमदर्शनी योग्य आहे किंवा कसे हे देखील पाहणे गरजेचे आहे. वादीने ई–निविदा टेंडर भरलेली आहे. इंडियन कॉन्ट्रॅक्ट कायदयाप्रमाणे Invitation to offer तसेच offer, proposal, acceptance, agreement व contract या प्रमाणे वादीस प्रस्तुतची दाद मागण्याचा अधिकार आहे किंवा कसे हे देखील पाहणे गरजेचे आहे.

**१४.** प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी निशाणी क्रं. २६ लगत दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार वादीस पुर्वी दिलेले काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे त्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती माळशिरस यांचे पत्र दाखल केलेले आहे. पुर्वीच्या कामाचा दर्जा तसेच वेळ न पाळणे यामुळे वादीस ब्लॅकलिस्ट करणेबाबत वरिष्ठांना कळविल्याचे पत्र दाखल केलेले आहे. वादीने केवळ ई–निविदा ९.९% कमी दराने भरलेली असुन नियमांनुसार वादीला कोणताही ई–मेल अथवा नोटीस पाठविलेली

नव्हती व वादीस सदर त्रुटींचे निरसन करण्यासाठी मुदत दिलेली नव्हती. यावरुन वादीने ई–निविदा कमी किमंतीस भरले असल्याचे व त्यास फेरतपासणीकरीता योग्य ती मुदत दिली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्याकरीता वादीने ई–निविदा भरलेबाबत कागदपत्र निशाणी क्रं. ३१ लगत दाखल केलेले आहे. वादीने ई–निवदा ही ऑनलाईन पद्धतीने भरलेली होती. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्रं. ३ ने देखील ई–निविदा दिलेल्या किंमतीस भरलेली होती.

**१५.** प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्रं. ३ यास दिलेला रस्त्याचा करार तसेच त्याचा कार्यारंभ आदेश थांबविण्याचा अधिकार वादीस आहे आणि वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामध्ये करार झाला आहे याबाबत आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या विधिज्ञांनी युक्तीवादादरम्यान Invitation to offer याकरीता खालील न्यायनिर्णयांवर विसंबुन राहुन युक्तीवाद केला.

1. **Jamshedpur Utilities and Services Company Ltd. Vs. State of Maharashtra. Writ Petition No. 466 of 2010 decided on 27.04.2010.**

Constitution of India, 1950 Articles 226, 14, 19(1)(g) and 39(b) Award of tender for water and sewerage treatment plant, judicial review of administration actions. A tender has to be an unconditional offer which is communicated intending to invited acceptance thereof, it has to be in proper form, offerer must be ready and willing and capable of

performing his obligations under proposed contract, Terms of invitation of tender being within the realm of contract are not open to judicial scrutiny unless there is arbitrariness, favouritism or unreasonableness, Statutory or public authority has power to deal with a contractual matter and assign reasons if tender is to be rejected, Rejection of bid put forward by petitioner was neither arbitrary nor unreasonable, petition dismissed.

**2. M/s. Maniram Enterprises Vs. The Managing Director, The Maharashtra Fisheries Development Corporation Ltd. & Anr., 2007(6) ALL MR 237**

Contract Act, 1872 Section 3 cancellation of even before opening of financial bids Tender, Tender process was cancelled, Thus, there was no contract at all, Issuance of tender notice is only an invitation to an offer, Petitioner submitted separate bids/tender, Each of it amounted to an offer, There is no contract at all, There is no law that tender process must be completed to an end and cannot be withdrawn/halted half way through.

**१६.** यावर विसंबुन राहुन प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या तर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या दरम्यान करार झालेला नाही. त्यामुळे रस्त्याचा आदेश वादीस थांबविता येणार नाही. याउलट वादीच्या विधिज्ञांनी युक्तीवादादरम्यान खालील न्यायनिर्णयावर विसंबुन राहुन युक्तीवाद केला.

1. **Chandrashekhar Vs. Vidharbha Enterprises, Civil Revision Application No. 9 & 10 of 2006, dated 26.09.2006.**

Civil Procedure Code, 1908 Section 20 Territorial jurisdiction of civil courts, Clause in tender documents specifying Mumbai jurisdiction, Whether it ousts jurisdiction of other courts prior to formation of contract, Held, such clauses come into effect only after contractual relationship is formed, Gadchiroli court has jurisdiction to try disputes related to non-acceptance of tender or allotment process.

2. **Banshidhar Construction Pvt. Ltd. Vs. Bharat Coking Coal Limited & Others, W.P.No.2896 of 2024, dated 18.07.2024.**

3. **Thakur Infraprojects Pvt. Ltd Vs. State of Maharashtra, Writ Petition No. 13976 of 2024, dated 06.05.2025.**

Rejection of bids, Compliance with eligibility criteria, JV's bid rejected on grounds including unsigned integrity pact by foreign partner and non certification of documents by Indian Embassy, Held rejection arbitrary and irrational as JV partner's power of attorney permits lead member to sign integrity pact, Apostilled documents valid as per Hague Convention, Rejection on technical grounds not sustainable.

१७. वादी तर्फे विधिज्ञांनी वरील न्यायनिर्णयावर अवलंबुन राहुन युक्तीवाद केला की, ई–टेंडर निविदामधील त्रुटींचे निराकारण होईपर्यंत प्रतिवादी क्रं. ३ यास रस्त्याचा आदेश देता येणार नाही. त्यामुळे वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. वादीस त्याच्या त्रुटी ई–मेल व्दारे कळविलेल्या नाहीत व त्यांचे निरसन करण्याकरीता आठ ते दहा दिवसांचा कालावधी नियमांप्रमाणे दिलेला नाही.

१८. प्रस्तुत अर्जामध्ये ई–निविदा टेंडर व त्यामुळे वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामध्ये करार झाला होता किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

A tender invitation, or invitation to offer or invitation to tender is a formal document inviting suppliers to bid for contract. It functions as only invitation to offer encouraging competitive proposals for goods, services or works without legally binding the issuer to accept any bid. It ensures transparency, fairness and openness. The tender document is not binding offer, a contract is formed only when the person who invites for bid accepts a specific submitted bid. It does not create contractual obligations until acceptance by the party. It is not binding upon host to accept any bid.

१९. याचप्रमाणे प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी ऑनलाईन पद्धतीने ई–निविदा प्रसिद्ध केलेली होती. सदर ई–निविदा ही Invitation to offer असुन वादीने भरलेली ई–निविदा, टेंडर ही ऑफर आहे. सदर ऑफर ही

प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी वरील नमुद कारणास्तव मान्य व कबुल केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यावर सदर ई–निविदा कायदेशीर बंधनकारक नाही. १ वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या दरम्यान करार झालेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी प्रतिवादी क्रं. ३ यांना दिलेले टेंडर थांबविण्याचा प्रथमदर्शनी अधिकार वादीस नाही, कारण वादी हा प्रतिवादी क्रं. १ व २ आणि ३ यांच्यातील करारामध्ये पक्षकार नाही. तसेच रस्त्याचे कामकाज सुरु झाल्यानंतर वादीस अपरिमित नुकसान होणार असल्याचे तसेच त्याला होणारे नुकसान पैशामध्ये भरुन काढता येणार नाही हे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. वादी हा रिमोट डॅमेजस मागत असुन कायदयानुसार ती मागता येणार नाही. तसेच वादी तर्फे दाखल न्यायनिर्णयानुसार वादीस दाद मागणेकरीता मा. उच्च न्यायालयात रिट दाखल करावी लागणार आहे.

**२०.** वर नमुद कथने व कागदपत्रांनुसार प्रथमदर्शनी केस ही प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या बाजुने आहे असे दिसते. प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने नाही. तसेच न्यायाचा तराजु देखील वादीच्या बाजुने नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्रं. १ व २ चे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबतः–</u>**

**२१.** वरील मुद्दे क्र.१ ते ३ यांची कारणमिमांसा विचारात घेतली असता वादीचे प्रथमदर्शनी केस त्यांचे बाजूने आहे हे सिध्द केलेले नाही. तसेच न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने असल्याचे देखील त्याने सिध्द केलेले नाही. अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल हे देखील सिध्द केलेले नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ च्या कारणमिमांसा अन्वये सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

निशाणी क्रं. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.03.14 15:48:16 +0530

दि.१३/०३/२०२६

**(आदित्य अ. व्यास)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : S.T.Korbu

(b) Name of the Court : $2^{nd}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C Malshiras,Dist. Solapur

(c) Order signed by P.O. On : 14-03-2026

(d) Order uploaded on : 14-03-2026